नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०३/१०/२०२६ (शनिवार )

## केबल चोरीचे ०२ गुन्हे उघड, ०४ आरोपी अटक
## एकुण ०१ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात पथकाने पोलीस स्टेशन उमरेड येथे दाखल असलेल्या इलेक्ट्रीक मोटर पंपचे केबल चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस आणले आहे. ०४ आरोपीतांना अटक करून १,५०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पोलीस स्टेशन उमरेड येथे दाखल अप क्र. ८१३/२६ कलम ३०३(२) गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदरचा गुन्हयाची उकल करून आरोपी निष्पन्न केले. दिनांक ०२/१०/२०२६ रोजी सदर गुन्हयातील आरोपी **नामे आरोपी क्र १) तारासिंग मेमसिंग पटवा, वय १९ वर्षे, रूईखैरी, ता. जि. नागपूर, २) राजेश रमेश झोटिंग, वय २२ वर्षे, रा. छोटीबारी, रूईखैरी आणि ३) मिलन रविंद्र राय, वय २१ वर्षे, रा. रुईखैरी, ता. नागपूर यांना एमआयडीसी बोरी परीसरातुन** ताब्यात घेतले. त्यांच्या कडे सदर गुन्हयाबाबत कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने उमरेड तालुक्यातील बेसुन व धुरखेडा परिसरात शेतशिवारातील इलेक्ट्रीक मोटर पंपचे केबल चोरीचे गुन्हे **केले असल्याचे सांगितले. तसेच चोरी केलेला मुद्देमाल आरोपी क्रं ४) शिलवान धनवान बोरकर, वय २३ वर्षे, रा. टाकळघाट, ता. हिंगणा,**

जि. नागपूर याला विकल्याचे माहीती दिली. आरोपी क्र ४) याला टाकळघाट येथुन ताब्यात घेतले.

पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून १) केबल जाळून त्यातील तांब्याची तार, वजन ५० किलो, किंमती ५०,०००/—रूपये गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल क्र. एम एच—४०/डी.एफ.—२५५६ किंमती १,००,०००/—रूपये असा एकूण १,५०,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर चारही आरोपीस अटक करण्यात आले आहे.

उघडकीस आलेले गुन्हे'

१. 'पोलीस स्टेशन उमरेड अप. क्र. ८१३/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं.
२. 'पोलीस स्टेशन उमरेड अप. क्र. ८६१/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं.



# १ किलो सोने देण्याचे आमिष दाखवून ९ लाख ५० हजाराची फसवणूक करणारे ०२ आरोपी अटक
# जलालखेडा पोलिसांची कामगिरी

पोलीस स्टेशन जलालखेडा :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग यांच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक श्री. विनोद जांभळे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन जलालखेडा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात पथकाने पोलीस ठाणे जलालखेडा येथे दाखल असलेल्या ०१ किलो सोने देण्याचे आमिष दाखवून फिर्यादीची ९ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपींचा शोध घेवुन सदर गुन्ह्याची उकल केली आहे. सदर गुन्हयातील ०२ आरोपीस अटक केली आहे.**

दिनांक २७/०९/२०२६ रोजी फिर्यादी रामभाऊ माणिकराव राऊत, वय ५७ वर्ष, रा. विष्णु माती नगर, टेकडीवाडी नागपूर यांनी पोस्टे जलालखेडा येथे येवुन रीपोर्ट दिली की, आरोपीने फिर्यादीस फोन करून आपल्याकडे ०१ किलो सोने असून ते विकायचे असल्याचे सांगितले. सोने खरेदी करण्याबाबत आरोपीने फिर्यादीशी वारंवार संपर्क साधला. आरोपीच्या सांगण्यावरून फिर्यादी अंबाडा, ता. नरखेड येथे मित्रासह गेले असता आरोपीने फिर्यादीस सोन्याचे दोन पत्रे दाखवून त्याचा विश्वास संपादन केला. त्यानंतर दिनांक २६/०९/२०२६ रोजी आरोपीने पुन्हा फोन करून सोने घेण्यासाठी बोलावले. दिनांक २७/०९/२०२६ रोजी फिर्यादी मित्रासह खारगड गावाजवळ आरोपीला भेटण्यासाठी गेले. त्यावेळी फिर्यादीने आरोपीस ९,५०,०००/— रुपये दिले. पैसे घेतल्यानंतर आरोपी तेथून निघून गेले. त्यानंतर फिर्यादीने खरेदी केलेल्या सोन्याची तपासणी केली असता त्यामध्ये सोने नसून पितळ धातूचे पत्रे असल्याचे निदर्शनास आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने सदर प्रकरणी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे कलम ३१८(४) ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

पोलीस स्टेशन जलालखेडा येथील तपास पथकाने सदर गुह्याचा तपास करीत असतांना गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे शोध घेतला असता सदर गुन्हयात आरोपी **नामे १) सुखदेव बुदल्या सोलके, वय ४० वर्ष, २) इजियस शेरू भोसले, वय ४० वर्ष, दोन्ही रा. बोरगाव (टुमनी), ता. आष्टी, जि. वर्धा यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न केले.**

**दोन्ही आरोपींना दिनांक ३०/०९/२०२६ रोजी ताब्यात घेवुन** अटक करण्यात आली. त्यांच्या कडे सदर गुन्हयाबाबत कौशल्यपुर्ण तपास केला असता त्यांनी सदर फसवणुकीचा गुन्हा केल्याची माहीती दिली.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून आरोपीच्या ताब्यात दोन दुचाकी वाहने आणि रोख रक्कम २,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जलालखेडा पोलीस पुढील तपास करीत आहेत.**

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत दिनांक ०३/१०/२०२६ रोजी खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

**पोलीस स्टेशन कुही :— पोलीस स्टेशन कुही** येथे पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र पाटील, प्रभारी अधिकरी ,पोलीस स्टेशन कुही यांनी राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय व ग्राम विकास विद्यालय, कुही येथे भेट देवुन विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली. यावेळी सदर कार्यक्रमास मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व सुमारे १५० ते १६० विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी 'सायबर प्रतिज्ञा' घेतली.

**पोलीस स्टेशन वेलतूर :— पोलीस स्टेशन वेलतूर** येथे पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वेलतूर यांनी मुकुंदराज स्वामी महाविद्यालय, पचखेडी येथे भेट देवुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास शिक्षकवृंद व सुमारे १०० ते १२० विद्यार्थी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन पाचगाव:— पोलीस स्टेशन पाचगाव** येथे पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांनी पाचगवा पोलीस स्टेशन नागरिकांची, पोलीस पाटलांची बैठक घेवुन सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली. यावेळी सदर कार्यक्रमास ५० ते ६० नागरिकांची उपस्थिती होती.

**पोलीस स्टेशन बेला :—** पोलीस स्टेशन बेला येथे सहा. पोलीस निरीक्षक श्री. उमेश नासरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बेला यांनी लोकजीवन विद्यालय, बेला येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. कार्यक्रमास मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व सुमारे ७० ते ८० विद्यार्थी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन मौदा :—** पोलीस स्टेशन मौदा येथे श्री. लसंते सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांनी ग्रामभेटी दरम्यान मौजा दहेगाव' येथे नवरात्र उत्सव व गावातील यात्रेच्या अनुषंगाने ग्रामपंचायत पदाधिकारी तसेच उत्सव मंडळाच्या आयोजकांची बैठक घेतली. त्यावेळी उपस्थितांना सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्याबाबतही जनजागृती करण्यात आली.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच UPI, PhonePe, Google Pay यांसारख्या डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.**

**नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**


ग्राम विकास शिक्षण मंडळ नागपूर द्वारा संचालित
राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय
कुही, जि. नागपूर.
रा.तु.म.ना.वि. नागपूर शी संलग्न, शासन मान्य
•कला व वाणिज्य शाखा•
नॅक द्वारा 'बी' ग्रेड मानांकित


महाराष्ट्र पोलीस
सायबर
जनजागृती अभियान
मुकुंदराजस्वामी कनिष्ठ महाविद्यालय
मुकुंदराजस्वामी महाविद्यालय
मुकुंदराजस्वामी आय.टी.आय
मुकुंदराज महाविद्यालय
PRINCIPAL CABIN


GAURAV






## जलालखेडा टाऊन परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे पुन्हा सुरू

पोलीस स्टेशन जलालाखेडा :— जलालखेडा टाऊन परिसरातील रस्त्यांवर सुरक्षेच्या दृष्टीने बसविण्यात आलेली सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा मागील अनेक दिवसांपासुन बंद होती. मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात सदर कॅमेरे पुन्हा सुरू करण्यासाठी पोलीसांनी पुढाकार घेऊन आवश्यक प्रयत्न केले.जलालखेडा पोलीसांच्या प्रयत्नांना ग्रामपंचायत तसेच व्यापारी संघटनेने सहकार्य केले. या सहकार्यामुळे बंद असलेली सीसीटीव्ही यंत्रणा पुन्हा कार्यान्वित करण्यात आली आहे.

सीसीटीव्ही कॅमेरे सुरू झाल्यामुळे परिसरातील नागरिकांची सुरक्षितता वाढण्यास तसेच चोरी, गुन्हे व इतर अनुचित घटनांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे. तसेच घडलेल्या घटनांच्या तपासासाठी सीसीटीव्ही फुटेजचा उपयोग होणार आहे.

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर २४ गुन्हे दाखल, १ लाख १२ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त

**दिनांक ०२/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण २४ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन वडोदा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे ०१ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे ०१ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ४५९०० मिली देशी दारू, १०८० मिली विदेशी दारू, १३२ लिटर मोहाफुल दारू, १२०० लिटर मोहाफुल सडवा, ४५० लिटर रसायन, ईतर साहित्य असा एकुण १,१२,७१०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७१३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७१३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २९ आरोपी अशा एकुण ८९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २९ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १६ आरोपी अशा एकुण १४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १९ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे २२ आरोपी अशा एकुण ७४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २९ आरोपी अशा एकुण ११७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २६ आरोपी अशा एकुण १४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.







जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर